२८७१५

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## विधान भवन, मुंबई.



**: : प्रसिध्दी पत्रक : :**

**विषय : (१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१,**

**(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१**

**(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१ यावरील सूचना मागविणे.**

दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी उपरोक्त विषयांकित तीन विधेयके महाराष्ट्र विधानसभेत पुर:स्थापित करण्यात आल्यानंतर विधेयकांचे विषय हे राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व त्यांच्यावर परिणाम करणारे असल्याने सदर विधेयके दोन महिन्यात लोकाभिप्राय अजमावण्याकरीता परिसृत करण्यात यावीत, असा प्रस्ताव राज्याच्या विधानसभेने संमत केला आहे. त्यानुसार ज्या व्यक्ती सुधारणा/ सूचना पाठवू इच्छितात त्यांनी आपल्या **सुधारणा/ सूचना तीन प्रतींमध्ये निवेदनाच्या स्वरुपात महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सोमवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे पाठवाव्यात** किंवा **a1.assembly.mls@gmail.com** या इमेलवर पाठविण्यात याव्यात.

उक्त विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड तसेच पुणे, नागपूर, औरंगाबाद व कोल्हापूर या विभागीय शासकीय मुद्रणालयामध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

तसेच हे विधेयके, महाराष्ट्र विधानमंडळाच्या "**www.mls.org.in**" या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २१ जुलै, २०२१

राजेन्द्र भागवत,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT,
## VIDHAN BHAVAN, MUMBAI



### PRESS-NOTE

**Subject: Inviting suggestions on**

**(1) L. A. Bill No. XVII of 2021 – The Farmers (Empowerment and Protection) Agreement on Price Assurance and Farm Services (Maharashtra Amendment) Bill, 2021.**
**(2) L. A. Bill No. XVIII of 2021 – The Farmers produce Trade and Commerce (Promotion and Facilitation) (Maharashtra Amendment) Bill, 2021.**
**(3) L. A. Bill No. XIX of 2021 – The Essential Commodities (Maharashtra Amendment) Bill, 2021.**

On 6 th July 2021, the aforementioned bills were introduced in Maharashtra Legislative Assembly. Since the subject matter of these bills are very important from the view of farmers in the State and since they are causing effect on the farmers, the Maharashtra Legislative Assembly have passed a resolution that the said bills be referred for eliciting the public opinion within a period of two months. Accordingly, any person who wish to send amendments/ suggestions, may send the same in the form of representation in the set of three copies to this Secretariat on or before **Monday, the 20th September 2021 till 5.00 p.m. addressed to Shri Rajendra Bhagwat, Principal Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai,** or on email id. **a1.assembly.mls@gmail.com.**

Marathi and English version of these bills are available for sale at Government Printing Depot, Pune, Nagpur, Aurangabad, Kolhapur and at the Manager, Publisher, Government Printing Press, Charni Road, Netaji Subhash Chandra Marg, Mumbai- 400004.

Moreover, the copies of these bills are also available on the website of Maharashtra Legislature- **www.mls.org.in**

**Vidhan Bhavan,**
**Mumbai,**
**Date : 21st July 2021**

**Rajendra Bhagwat,**
**Principal Secretary,**
**Maharashtra Legislature Secretariat**

RNI No. MAHBIL /2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ७, अंक ६(४)] मंगळवार, जुलै ६, २०२१/आषाढ १५, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ६ जुलै २०२१ रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XIX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९.**

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५५ चा १०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५५ चा १०.

"(१ख) पोट-कलम (१क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असणारी असाधारण परिस्थिती असताना आदेशाद्वारे, साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करील किंवा त्यास प्रतिबंध करील.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

संसदेने, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, अशी कडधान्ये, डाळी, बटाटा, कांदे, खाद्य तेलबिया व तेल यांचा अंतर्भाव असेल अशा अन्नपदार्थांचा पुरवठा युद्ध, दुष्काळ, असाधारण किंमतवाढ आणि गंभीर स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेली असाधारण परिस्थिती असतांनाच केवळ विनियमित करता येईल यासाठी तरतूद करण्याकरिता, अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २०२० (२०२० चा केंद्रीय अधिनियम-क्रमांक २२), (यात यापुढे ज्याचा निर्देश "केंद्रीय अधिनियम" असा करण्यात आला आहे), द्वारे अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ (१९५५ चा केंद्रीय अधिनियम क्रमांक १०) यामध्ये सुधारणा केली आहे.

२. केंद्रीय अधिनियमामध्ये दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेल्या असाधारण परिस्थितीमध्ये साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करण्यासाठी किंवा त्यास प्रतिबंध करण्यासाठी राज्य शासनाकरिता कोणतीही तरतूद नाही.

३. दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेल्या असाधारण परिस्थितीमध्ये साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करण्याचा किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्याकरिता, महाराष्ट्र शासनास, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्याच्या कलम ३ मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ६ जुलै, २०२१.

**छगन भुजबळ,**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ६ जुलै, २०२१.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १(३).**—या खंडान्वये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा उपरोल्लिखित प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.